परिपत्रक

क्रमांक सीएलआर. १८८८/३८३९१/पंधरा . मुंबई, १६ ऑक्टोबर, १९८९.

या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक ११ जानेवारी १९८९ च्या संदर्भात सर्व अधीक्षकांना पुन्हः कळविण्यात येते की, त्यांनी एका सीएल्–२ अनुज्ञप्तीधारकाकडून दुसऱ्या सीएल्–२ अनुज्ञप्तीधारकास देशी मद्य विकत घेण्याची परवानगी देऊ नये. महाराष्ट्र देशी दारू नियम १९७३ च्या नियम १७ प्रमाणे आसवनी सोडून इतर कोणत्याही मार्गाने ठोक विक्रेत्याला जर मद्य आणून विकण्याची परवानगी हवी असेल तर तशी परवानगी त्यांनी आगाऊ आयुक्ताकडून घेणे आवश्यक आहे याची कृपया सर्व अधीक्षकांनी नोंद घ्यावी.

परिपत्रकाची पोंच पाठवावी.

[ पं. बा. सावंत ]
आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता.

प्रति,

१] सर्व अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क.
२] या कार्यालयातील सर्व उप–आयुक्त.
३] सर्व कार्यासने.
४] कार्यासन क्रमांक १५ व १९ [ पाच प्रती. ]